# जिल्हा परिषद,बीड
# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग बीड

जा.क्र./ता.शा. /ग्रा.पा.पु.वि.बीड /२०२२ दि. 07 /07 /२०२२

**सेवानिवृत्त शासकीय निमशासकीय अधिकाऱ्यां मधून करार पद्धतीने भरावयाच्या पदासाठी जाहिरात**

**आर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख/5 /07 /2022 सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत**

ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद बीड या कार्यालयात जलजीवन मिशन कामाकरिता सेवानिवृत्त शासकीय / निमशासकीय (विहित कालमर्यादेसाठी) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण 2715/ प्र.क्र.100/दिनांक 17 डिसेंबर 2016 व मा. संचालक जलजीवन मिशन राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांचे पत्र दि.09 नोव्हेंबर 2021 अन्वये खालील तक्त्यात नमूद पदे नावासमोर नमूद संवर्गातून वर्ग-1 व 2 सेवानिवृत्त शासकीय / निमशासकीय अधिकाऱ्यांमधून करार पद्धतीने पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदनाम | संवर्ग | मानधन | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | Engineering Specialist (Executive Engineer equivalent)-1 | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग | सा.प्र.वि.शासन निर्णय दि.17.12.2016 मधील ड(1) (क) नुसार | 01 |
| 2. | Engineering Co-coordinator ( Dy. Engineer equivalent)-2 | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग | | 02 |

सदर पदासाठी जाहिराती मधील अटी व शर्ती जिल्हा परिषद बीडची अधिकृत जाहिरात www.zpbeed.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तरी इच्छुक उमेदवारांनी दिनांक 08 /07 /2022 ते दिनांक 15 /07 /2022 रोजी सायंकाळी 6.00 पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून आपले अर्ज कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड येथे विहित मुदतीत सादर करावा विहित वेळेनंतर / तारखेनंतर आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत अपूर्ण स्वरूपातील अर्ज स्वाक्षरी नसलेला अहर्ता धारण करिता नसलेला अर्ज पद भरती प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी उमेदवारांची अर्ज व RESUME सह सेवानिवृत्त आदेश शैक्षणिक अहर्तेचे प्रमाणपत्र सेवेच्या कालावधीत कोणती विभागीय चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणतीही शिक्षा झालेली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे तसेच आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी अर्जाच्या छाननी नंतर पात्र उमेदवारांची यादी दिनांक 18 /07 /2022 रोजी सायंकाळी 6.00 वा. पर्यंत संकेतस्थळावर व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आस्थापनेवरील सेवा निवृत्त व उप अभियंता / कार्यकारी अभियंता या पदावर कार्य केलेला कमीत कमी ६ महिने अनुभव आवश्यक राहील किंवा ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद येथील कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक राहील सदर पद भरती प्रक्रियेत बदल करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड कडे राखून ठेवण्यात येत आहे.

प्रदीप काकडे
प्रकल्प संचालक (पाणी व स्वच्छता)
तथा उप.मु.का.अधिकारी
जिल्हा परिषद बीड.

अजित पवार (भा.प्र.से.)
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बीड

## जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत करार पद्धतीने पदभरती करण्या अनुषंगाने अटी व शर्ती

1. जाहिरातीमध्ये नमूद पदनामासमोर नमूद किंवा वेतन श्रेणीतून अधिकारी सेवानिवृत्त झालेला असणे आवश्यक आहे.
2. सदर पदाकरिता सेवेच्या अटी व शर्ती इत्यादी बाबीसाठी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13/दि.17/12/2016 या शासन निर्णय मध्ये शासनाच्या संकेतस्थळावर अवलोकन करावे.
3. सदर पदाच्या मानधनाकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण 2715/प्र.क्र.100/13 दि.17/12/2016 मधील तरतुदी लागू राहतील.
4. सदर पदासाठी वेळोवेळी निर्गमित शासन निर्णय / शासन परिपत्रक / शासन आदेशातील अटी / शर्ती लागू राहतील.
5. सदर पदासाठी वयोमर्यादा ही जास्तीत जास्त 65 वर्ष इतकी राहील.
6. सदर पदाची नेमणूक ही पूर्णतः सामान्य प्रशासन विभागाच्या दि.17/12/2016 शासन निर्णयानुसार करार पद्धतीने नियुक्ती राहील.
7. सदर पदाची नेमणूक 11 महिन्यासाठी करार पद्धतीने करण्यात येईल करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे कार्य मूल्यमापन करार संपुष्टात येण्यापूर्वी पूर्ण करण्यात येऊन त्यांचे काम समाधानकारक आढळल्यास आवश्यकतेनुसार मुदत वाढ देण्यात येईल.
8. सदर मुलाखतीकरता कोणताही प्रवास भत्ता अनुज्ञेय नाही.
9. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे मुलाखतीसाठी वेळ व दिनांक इत्यादी निवड प्रक्रिये बाबतच्या सर्व सूचना या विभागाच्या www.zpbeed.gov.in या संकेतस्थळावर देण्यात येतील.
10. अर्ज संबंधित ठिकाणी विहित मुदतीत सादर करण्यासाठी जबाबदारी उमेदवारांची राहील विहित मुदतीनंतर आलेले अर्ज तसेच विविध प्रपत्रात नसलेल्या अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
11. अर्ज करताना लिफाफा यावर परिणामाचा उल्लेख स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.
12. करार पद्धतीने नियुक्त केलेल्या पदाच्या सर्व नेमणूक करार संपल्यानंतर संपुष्टात येतील करार पद्धतीने नियुक्त अधिकारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही त्यांना करार पद्धतीने केलेल्या सेवेच्या आधारे शासकीय सेवेत सामावून घेतले जाणार नाहीत.
13. प्रस्तुत पदावर नियुक्तीसाठी उमेदवाराने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे राजकीय अथवा अन्य प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
14. सदर नामिका सूचीतील व्यक्ती मधूनच करार पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल सदर नामिका सूचीची वैधता जास्तीत जास्त तीन वर्ष राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात येईल.
15. नियुक्तीच्या कालावधी व करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित त्याची राहील तसेच सदर बंदपत्रात करार पद्धतीने नियुक्ती देताना शासन निर्णय नुसार विहित केलेल्या अटी व शर्ती या कार्यालयाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा शपथपत्र देणे बंधनकारक राहील.
16. करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मांनसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
17. करार पद्धतीने नियुक्त , करावया चा सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा आशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी असे प्रमाणपत्र सादर करणे.
18. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
19. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती सोपवलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
20. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

21. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामग्री बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

22. करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपवलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले पदाधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

23. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारे प्रशासकीय व वित्तीय अधिक अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

24. सदर पदासाठी आवश्यक असणारी,अटी शर्ती मधे नमूद अनुभव या बाबत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

25. अवर सचिव, महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, 7 वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, नवीन मंत्रालय इमारत मुंबई-400001 या पत्राचे शिफारसी प्रमाणे आलेल्या अर्जाचा प्राधान्य देण्यात येईल.

26. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कमीत कमी ६ महिने उप-अभियंता / कार्यकारी अभियंता या पदावर काम केल्याचा अनुभव आवश्यक राहील.

प्रदीप काकडे
प्रकल्प संचालक (पाणी व स्वच्छता)
तथा उप.मु.का.अधिकारी
जिल्हा परिषद बीड.

अजित पवार (भा.प्र.से.)
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बीड

# अर्हता

| अ.क्र. | Designation | No of Resources | Honorarium (Monthly In Rs) | Educational Qualification Outsourcing |
|---|---|---|---|---|
| 1. | Engineering Specialist (Executive Engineer equivalent)-1 | 01 | शा.प्र.वि.शासन निर्णय दि.17.12.2016 मधील ड (1) क नुसार | Preferred experience Min 7 Years in field of execution of under water supply departments civil works must be with tendering procedure and monitoring and evolution of civil projects having relevant knowledge of computer skill candidate should withdraw 60% salary amount in previous job which has coated in advt. |
| 2. | Engineering Co-coordinator ( Dy. Engineer equivalent)-2 | 02 | शा.प्र.वि.शासन निर्णय दि.17.12.2016 मधील ड (1) क नुसार | Preferred experience Min 5 Years in field of execution of under water supply departments civil works must be with tendering procedure and monitoring and evolution of civil projects having relevant knowledge of computer skill candidate should withdraw 60% salary amount in previous job which has coated in advt. |

प्रदीप काकडे
प्रकल्प संचालक (पाणी व स्वच्छता)
तथा उप.मु.का.अधिकारी
जिल्हा परिषद बीड.

अजित पवार (भा.प्र.से.)
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बीड

## पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या

| अ.क्र. | पदनाम | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| 1. | Engineering Specialist (Executive Engineer equivalent)-1 | 1. Project Management Consultancy<br>2. त्रयस्त पाहणी यंत्रणेच्या TPIA कामाचे सनियंत्रण व मुल्यमापन करणे<br>3. IMIS वरील Data updation व Data बाबत आवश्यक ती कार्यवाही करणे उपोरक्त कामाव्यतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद यांनी जल जीवन मिशन विषयक दिलेली Monitoring संबंधीत सर्व काम पाहणे<br>4. मुख्य कार्यकारी अधिकारी / कार्यकारी अभियंता, यांनी सुचित करण्यात आलेले सर्व शासकीय कामे विहित वेळेत पूर्ण करणे, प्रगतीपथावरील कामाचे गुणनियंत्रण बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार सनियंत्रण करणे.<br>5. जल जीवन मिशन अंतर्गत प्रगतीपथावरील / पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांचे गुणवत्ता राखण्यासाठी दक्षता पथक प्रमुख म्हणून कामकाज पाहणे. |
| 2. | Engineering Co-coordinator ( Dy. Engineer equivalent)-2 | 1. Project Management Consultancy.<br>2. त्रयस्त पाहणी यंत्रणेच्या TPIA कामाचे सनियंत्रण व मुल्यमापन करणे<br>3. IMIS वरील Data updation व Data बाबत आवश्यक ती कार्यवाही करणे उपोरक्त कामाव्यतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद यांनी जल जीवन मिशन विषयक दिलेली Monitoring संबंधीत सर्व काम पाहणे.<br>4. मुख्य कार्यकारी अधिकारी / कार्यकारी अभियंता, यांनी सुचित करण्यात आलेले सर्व शासकीय कामे विहित वेळेत पूर्ण करणे<br>5. Engineering Specialist यांनी सोपवलेली कामे करणे. |

प्रदीप काकडे
प्रकल्प संचालक (पाणी व स्वच्छता)
तथा उप.मु.का.अधिकारी
जिल्हा परिषद बीड

अजित पवार(भा.प्र.से)
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बीड